**CNR No. MHOS120009582014**

**भूसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७१८/२०१४**

**मनोहर वि.शासन व इतर**

**निशाणी क्र.३० खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार सुभाष मनोहर पाटील याने प्रकरणातील मुळ अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू दिनांक २४.०६.२०१५ रोजी झाल्यामुळे व त्यांचे वारस वेळेमध्ये अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला १० वर्षे, ६ महिने, १७ दिवस विलंब माफ करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू २४.०६.२०१५ रोजी झालेला आहे. प्रस्तुत अर्जदाराला प्रस्तुत प्रकरणाची माहिती नसल्यामुळे त्याला सदरील वेळेत विधिज्ञांना भेटणे झाले नसल्यामुळे मयत मुळ अर्जदाराचे वारस वेळेत अभिलेखावर घेता आलेले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती त्याने केली आहे.

३. गैरअर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ प्रकरण हे भु संपादन निर्देशन अर्ज म्हणुन नोंदणी करण्यात आले आहे. मुळ प्रकरण मावेजातील वाटपाबाबतचे आहे. निशाणी क्र. १ चे सोबत दाखल पत्राचे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, सक्षम प्राधिकारी यांनी मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचे नांव अवॉर्डमध्ये नमुद आहे. त्यामुळे मयत अर्जदाराच्या वारसांना प्रस्तुतचे प्रकरण चालविण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट होते. दस्तएवेज यादी निशाणी क्र.२९ वरील मृत्यू प्रमाणपत्र वरुन मुळ अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू २४.०६.२०१५ रोजी झाल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. प्रस्तुतचे मुळ प्रकरण हे जमीनीचा वाढीव मावेजा मिळण्याबाबत दाखल केले आहे. अशा प्रकरणात मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील न्यायनिर्णयानुसार अर्जदाराच्या मृत्यूमुळे अशी प्रकरणे अवसानीत काढता येत नाहीत व न्यायालयाला अभिलेखावर असलेल्या उपलब्ध पुराव्यानुसार न्यायनिर्णय द्यावा लागतो. त्यामुळे, अशा प्रकरणात अर्जदाराचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब हा उदारमतवादी दृष्टीकोण घेवून माफ करणे न्यायोचित राहते. अर्जातील कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित राहिल. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. निशाणी क्र. ३० खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत अर्जदार यांनी सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.07.14 17:46:57 +0530

दिनांक – १४.०७.२०२६

(राहुल द. डांगे),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 14/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 14/07/2026 |
| Order uploaded on | --- | 14/07/2026 |